# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

### दिनांक १६/१२/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१७) इतिवृत्त

**शनिवार** दिनांक **१६ डिसेंबर २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.४० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गायकवाड दिलीप नारायण
3. सौ. दलाल लता श्रीनिवास
4. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
5. श्री. मुजीब आलमशाह खान
6. श्री. पांडे विनायक प्रभाकर
7. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
8. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
9. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
10. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
11. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
12. श्री. सावंत मधुकर दामोधर
13. श्री. मो. जावेद मो. इसाक
14. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**संवाद :**

श्री.मुजीब खान : औरंगाबाद शहरात रंगीन दरवाज जवळ मोठे अनाथ आश्रम चालते त्याचे अध्यक्ष पै. श्री. मोहमंद खान यांचे अपघाती निधन झालेले आहे त्यांना या सभागृहा तर्फे श्रध्दांजली अर्पण करावी.

मा. सभापती : ठिक आहे सर्वानी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.
(याच वेळी रंगीन दरवाज जवळील अनाथआश्रमचे अध्यक्ष पै. श्री. मोहमंद खान यांचे अपघाती निधनाबद्दल त्यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.मधुकर सांवत : आजच्या सभेला मा. आयुक्त तसेच उपआयुक्त उपस्थित नाही. जेपर्यत मा. आयुक्त येत नाही तो पर्यत सभेला सुरूवात करू नये.

श्री.मुजीब खान : सभेला स. सदस्य वेळेवर येतात अधिकारी सभागृहात वेळेवर येत नाहीत, खंत वाटते. कार्यालयीन वेळ संपल्यानंतरही रात्री उशीरापर्यंत कार्यालय चालू असते परंतू कोणतेही विकास काम होत नाही. रोषनगेट येथील नाला ट्रेंनिगचे काम दीड महिन्यापासून झाले

नाही. माझ्या वार्डात कोणते विकास काम झाले याचा खूलासा घेण्यात यावा. अधिकारी येत नाही तोपर्यत सभेचे कामकाजचालू करू नये.

श्री. संजय सिरसाट : मा. आयुक्त सभेला नाहीत. ते येथे आलेले आहेत. १५ मिनिटांसाठी सभा तहकूब करावी. मा. आयुक्तांना सभेला बोलावून घ्यावे.

मा. सभापती : १५ मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते.

(वेळ दुपारी १२.०० वा. पुन्हा सभेला १२.१५ वा. सुरूवात)

श्री. मुजीब खान : सर्वच स.सदस्य स्वत:चा वेळ काढून वार्डातील विकास कामे करण्यासाठी येथे येतात. १५ ते १८ महिने झाले अद्याप विकास कामास सुरूवात झाली नाही. महापालिका कार्यालयात दुरध्वनी केल्यास कुणाही अधिकाऱ्याशी संपर्क होत नाही. विकास कामा बाबतच्या संचिका तयार होतात. विकास कामे होण्या संदर्भात स्थायी समिती तसेच सर्वसाधारण सभा निर्णय घेते मा. आयुक्त अनेक ठिकाणी स्थळ पाहणी करतात. दोन तीन दिवसापेक्षा जस्त कालावधी संचिका एका विभागात राहू नये असा निर्णय सभागृह घेते. असे असतांना सुध्दा विकास कामाच्या संचिका जणूनबूजून लेखा विभागातून क्यूरी काढून बाजूला टाकली जते. एक-एक महिना संचिका पडून राहतात. संबधीत कार्यकारी अभियंता यांची भेट घेतली असता लेखा विभागात संचिका गेलेली आहे असे सांगण्यात येते. संचिका आली तरी त्यावर शेरा मारलेला असतो, हे योग्य नाही. काही वार्डातील विकास कामाच्या संचिका आजपर्यत थांबलेल्या नाहीत. मकसूद कॉलनीचा नाला ट्रेनिंगचे कामाबाबत उपआयुक्त यांना मार्कीग करून घेण्याचे आदेशीत केले होते. डी. पी. रोडवर काम आहे. अनेक वेळा उपआयुक्त (महसूल) यांना भेटलो परंतू अद्याप काम केले नाही. काम होत नसेल तर तसा खूलासा करावा.

श्री. मधुकर सांवत : स. सदस्य पोटतिडकीने बोलातात विषय समजवून घेवून मार्गी लावावा.

मा. सभापती : या संदर्भात संबधीत अधिकारी यांनी खूलासा करावा.

कार्य.अभि.(ड्रे.व वि.) : स. सदस्य श्री. मुजीब खान यांचे वार्डात म्हाडाच्या वसाहतीपासून ते रोषणगेटपर्यत एक नाला वाहतो. तेथे काम करण्यासाठी अंदाजपत्रक तयार केले होते. बजेट कमी पडले होते. आता बजेट पण ॲडजेस्ट केले. त्या कामाचे अंदाजपत्रक लेखा विभागाकडून मा.आयुक्ताकडे सादर केलेले आहे. स्लॅब टाकण्याचे प्रस्तावित केले होते. मा.आयुक्तांनी चर्चा करण्यासाठी ठेवलेले आहे. काही ठिकाणी स्लॅब टाकणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : संबधीत अधिकारी यांना सुचना करतो की ज्या ज्या ठिकाणी स्लॅब टाकणे आवश्यक आहे तेथेच टाकण्यात यावे.

श्री. मुजीब खान : नाल्याच्या बाजूला अतिक्रमण झालेले आहे तेही काढण्यात यावे व रस्ता करून द्यावा. आम्ही सदस्य पत्र देतो परंतू त्यांची अंमलबजवणी होत नाही. सदर ठिकाणी मा.आयुक्त तसेच मा. सभापती यांनी भेट द्यावी.

मा. सभापती :जण्या येण्याची व्यवस्था होईल व तेथे पून्हा अतिक्रमण होणार नाही या पध्दतीने सदर ठिकाणी काम करावे. मा.आयुक्त त्या ठिकाणी भेट देतील.

श्री. विनायक पांडे :१० ते १५ दिवसापासून अनुकंपा भरतीचा घोटाळा गाजतो आहे. उपआयुक्त यांचेसह २० कर्मचाऱ्यांना या संदर्भात नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. या बाबतीतही संपूर्ण खुलासा मा.आयुक्ताकडून घेण्यात यावा.

मा. आयुक्त : अनुकंपा संदर्भात जी प्रकरणे आहेत त्या संबधीची चौकशी करण्याचे मुख्य लेखा परीक्षक श्री.औताडे यांना आदेशीत केले होते. त्यांनी एक रिपोर्ट दिला होता. अनुकंपा भरती प्रकरणाची जी प्रक्रिया होती ती पूर्णपणे हाताळलेली नाही अशा काही केसेस काढलेल्या आहेत. ही प्रकरणे अनुकंपाची नसून लाड समितीची आहेत. अनुकंपा म्हणजे कोणत्याही वर्ग -३, ४ संवर्गातील कर्मचारी यांचा कामावर असतांना मृत्यू झाला तर त्यांचे जगी त्याचे वारसांना नोकरीवर घेतो. वयाच्या ५० वर्षापूर्वी जर एखादा कर्मचारी मेडीकल अनफिट झाला असेल तर त्यांचे वारसांना नोकरी मिळत असते परंतू आता ते बंद झाले आहे. हा अनुकंपाचा प्रकार झाला. लाड कमेटी हे फक्त सफाई मंजूर यांना लागू आहे. ते सेवानिवृत्त झाले तरी त्यांचे जगी त्याचे वारसांना नोकरी दिली जते. रिपोर्ट नुसार एक चूक अशी काढलेली होती की ज्या कॅडरला लाड कमेटी लागू नाही त्यांना पण अनुकंपावर नोकरी देण्यात आली. दुसरे असे की सदर संचिका ह्या आयुक्तापर्यत मंजूरीसाठी यावयास पाहिजेहोत्या त्या आलेल्या नाही. हे प्रकरण माझ्या समोर आले होते. लाड कमिटीचे निकष चांगल्या प्रकारे लावण्यात आले आहे फक्त अधिकाराचा प्रश्न आहे. या प्रकरणात माझ्याकडे कार्योत्तर मंजूरीसाठी ठेवावे. ज्यांचा अधिकार होता त्यांना कार्योत्तर मंजूर देवू व ज्यांनी चूक केलेली आहे त्यांचेवर कार्यवाही करू. ज्याचा अधिकार होता ते तिथपर्यत आले नाही ती त्याची चूक नाही सिस्टमची चूक आहे. ज्या कॅडरला लाड समितीचे नियम लागू होत नाही त्यांना लागू करण्यात आले. अशा कर्मचाऱ्यांना नोकरीतून आपणांस का काढण्यात येवू नये म्हणून नोटीसेस बजवल्या आहेत. त्याचे म्हणणे ऐकू घेतल्याशिवाय अंतिम निर्णय घेता येणार नाही. नोटीसचे उत्तर देण्यासाठी तीन दिवसाची मुदत दिलेली असून यामध्ये काही कर्मचारी यांचेकडे जेकाम होते ते सफाई मजूर सारखेच होते म्हणून त्यांना लाड कमेटीचे निकष लागू करण्यात आले असे मेन कन्डीशन दिसते. परंतू लिगली लाड कमेटी लागू नसेल तर त्यांना अधिकार देता येत नाही. बरेचसे उत्तर आलेले आहे ते वाचल्यानंतर निर्णय घेवू.

श्री. संजय सिरसाट : काही कर्मचारी मजूर म्हणून कार्यरत झाले. कालातंराने त्यांना जमान म्हणून नियुक्ती दिली. रजिस्टरवर पण नोंद तशी आहे. अशा कर्मचाऱ्यांना लाड कमेटीच्या शिफारशी लागू होणार की नाही.

मा. आयुक्त : मजूर या कॅडरमध्ये सलेक्शन झाले व त्यांचेकडून काम कोणतेही घ्या अंतर्गत कॅडर बदलले तर त्यास मान्यता नाही. परंतू पदावर राहिले तरच लाड कमेटीच्या निकषा प्रमाणे घेता येते. परंतू एखादा कर्मचारी यांचे प्रमोशन होवून क.लिपीक झाले तर त्यांना याचा फायदा घेता येत नाही. एखादा कर्मचारी यांना जमान म्हणून फ्रेश ऑडर दिली असेल तर त्यांना लाड समितीचा फायदा घेता येणार नाही.

श्री.दिलीप गायकवाड : महापालिकेच्या पाच अधिकाऱ्यांचे जत प्रमाण पत्र बोगस आहे. त्यात १.श्री. महमंदखान सरदार खॉन २.अय्युब खान नूरखान ३.श्री. रविद्र निकम ४. श्री. एस. आर. जारे व श्री. दिलीप सुर्यवंशी यांचा समावेश आहे.

मा. आयुक्त : ज्या कॅडरमध्ये या अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली असेल त्याची जत प्रमाणपत्र तपासणी करून घेवू.ज्यांची नियुक्ती केली त्यांची नियुमानूसार सहा महिण्याच्या आत जत प्रमाणपत्र पडताळणी करून दिले पाहिजे. काल एक पत्र आले त्यात काही शिक्षकांची नावे सुध्दा आहेत ती पण तपासणी करून घेवू.

सौ. लता दलाल : अनेक कर्मचारी मजूर म्हणून नियुक्त झालेले आहे परंतू आजते शिपाई, क.लिपीक तर काही लाईनमन म्हणून काम करतात. याची आपण चौकशी केली आहे का यात सूध्दा अनुंकंपा धारक आहेत. त्याची कॅटॅगिरी आपण कुठे गनणा करणार आहात. मजूर म्हणून नियुक्त झाले ते वेगवेगळया पदावर काम करीत आहेत अशा कर्मचाऱ्याची प्रशासनाकडे माहिती आहे का. याची चौकशी करण्यात यावी.

मा. आयुक्त : याची चौकशी केली जईल. मजूर म्हणून नियुक्ती असेल व काम वेगळे दिले असेल तर कॅडर बदलत नाही. त्यांना लाड कमेटीचा फायदा होईल.

श्री. मिलींद दाभाडे : काही मजूरांना शिपाई, क.लिपीक म्हणून काम दिले असे काम देतांना कोणते निकष लावले आहेत.

श्री.त्र्यंबक तुपे : काही मजूर यांना जमान म्हणून काम दिले जते त्यांना वसूलीला पाठविले जते त्यामूळे झोन कार्यालयात जे मजूर आहे ते साफसफाईसाठी जण्यास टाळाटाळ करतात. त्याचा परीणाम साफसफाईच्या कामावर होतो. त्यामूळे ज्या पदावर त्यांची नियुक्ती असेल तेच काम त्यांना देण्यात यावे.

मा. सभापती : ज्यांची ज्या पदावर नियुक्ती केलेली आहे त्यांचेकडून तेच काम करून घेण्यात यावे.

श्री.दिलीप गायकवाड :श्री. मोहमंद खान सरदार खान वार्ड अधिकारी यांना सन २००३ मध्ये मा. न्यायालयाने असे आदेशीत केले होते की यांना सेवेतून बडतर्फ करण्यात यावे. याचा खूलासा करण्यात यावा.

सहा.आयुक्त-१ :२० एप्रिल २००४ ला शासनाने एक जी.आर. काढलेला आहे. जेकर्मचारी अनुसूचित जमाती या संवर्गातून सेवेत १९९५ पूर्वी लागलेले आहे. जर त्यांचे जतीचे प्रमाणपत्र अवैध झाले तर त्यांचेवर कुठलीही कार्यवाही करू नये त्यांना खुल्या संवर्गात ट्रीट करावे व ते जे रिक्त होणारे पद आहे त्यावर अनुसूचित जमाती संवर्गातील कर्मचाऱ्यांना नियुक्त करावे. श्री. मोहमंद खान यांचे जत प्रमाणपत्र अवैध झाले आहे त्या संदर्भात त्यांनी मा. उच्च न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे. त्या संदर्भात अद्याप निर्णय लागलेला नाही. २००३ मध्ये मा.न्यायालयाचा कोणताही आदेश नाही. पडताळणी समितीने त्यांचे जत प्रमाणपत्र अवैध ठरविले होते. त्याचे विरोधात ते न्यायालयात गेले होते आणि २००४ चा हा शासन निर्णय आहे.

श्री. मुजेब खान : प्रत्येक ज्या त्या अधिकाऱ्याकडे किती शिपाई कर्मचारी आवश्यक आहे. माझ्या माहितीनूसार काही ठिकाणी पाच, काहीकडे सहा शिपाई आहे. काही अधिकाऱ्याच्या घरी काम करण्यासाठी आहे. यास पायबंद करणार की नाही. मागिल एक वर्षापासून शासनाने या शहरासाठी गुठेंवारी कायदा लागे केला सुरूवातीस याची चांगल्या प्रकारे राबविली गेली परंतू ती आता दोन महिण्यापासून ही मोहिम संथ गतीने चालू आहे. अशीच परीस्थिती राहिली तर या शहरातील नागरीकांना सुविधा देवू शकणार नाही. माझ्या माहिती प्रमाणे आयुक्त जमान दौरा काळात कुणीही त्या संबधीत एजन्सीशी बैठका घेवून योग्य ते मार्गदर्शन करून या कामास गती दिली नाही. मागिल दिड महिण्यात

गुंठेवारीच्या किती संचिका आल्या, किती लोकांना चलन दिले. अनेक लोकांची मागणी आजही प्रलंबीत आहे. साईटवर जवे लागते. तोही कर्मचारी वर्ग अपूरा पडतो. नागरीक आजही गुंठेवारीची रक्कम भरण्यास तयार आहे. बऱ्याच नागरीकांची मागणी अशी आहे की चलनच मिळत नाही. सर्वसाधारण सभेने निर्णय घेतला की तीन हप्त्यात पैसे घेण्यात यावे. परंतू तिथपर्यत आपले प्रशासन पोहचत नाही. संबधीत एजन्सीचे कार्यालयात कुणीही नसते. अतिशय महत्वाचा विषय आहे. प्रशासनाने या बाबतीत कार्यवाही करावी. तरच नागरीकही प्रतिसाद देतील. वार्ड वाईज बैठका घेण्यात याव्या. गुंठेवारीचे पैसे भरण्यास नागरीक तयार आहेत.

श्री.मो.जवेद मो.इसहाक : जे गुंठेवारीचा सर्वे झाला त्यात खूप चूका झालेल्या आहेत. ज्या ४०० वर्षापूर्वीच्या वस्त्या आहेत त्यांना सूध्दा गुंठेवारीत घेतले आहे हे बरोबर नाही. माझ्या वार्डात रशिदपूरा ४०० वर्षापूर्वीचा आहे. ही जुनी वसाहत असून गुंठेवारीत घेतले आहे. या संदर्भात मी दीड वर्षापूर्वी मा. आयुक्तांना पत्र दिले अद्याप माहिती दिली नाही.

श्री.मुजेब खान : गुंठेवारीत कोणकोणता भाग कोणत्या वार्डात येतो त्या बाबतीत नकाशा तयार करावा. अशी सर्वच सदस्यांची मागणी आहे. जेणे करून त्या त्या भागातील सदस्यांना त्या नागरीकांना गुंठेवारीचे पैसे भरण्यास भाग पाडतील. परंत अद्याप पर्यत माहिती मिळालेली नाही.

मा. आयुक्त : गुंठेवारी म्हणून अमूक क्षेत्र आहे हे डिक्लेअर करता येत नाही. सन २००१ च्या पहिले जे बांधकाम झालेले आहे ते गुंठेवारीत येते. ९९ टक्के असे बांधकाम एकत्र एकाच भागात राहते. इमारत बांधकामा संबधीचा कायदा जेंव्हा आला त्यानंतर जे बांधकाम झाले त्यास लिगल करू शकत नाही. ते अनधिकृत बांधकाम आहे. जर त्या पूर्वीच्या बांधकामात बदल झाला असेल तरी ते अनधिकृत बांधकाम म्हणून आहे. प्रशासनाची हीच भूमिका आहे की तात्काळ नागरीकांनी गुंठेवारीत करून घ्यावे ते त्यांचे फायदयाचे आहे.

श्री. मुजेब खान : माझे जुने घर हे २००१ च्या पहिले तयार झालेले आहे वडीलोपार्जीत आहे. ते गुंठेवारीत येते म्हणून नोटीस येते. ते मी प्रत्यक्ष येवून निदर्शनास आणून दिले तरी ही दुसरी नोटीस दिली जते. सर्वे करावा केंव्हा घर बांधलेले आहे, तेथे विकास कामे करावी.

सौ.लता दलाल : गुंठेवारी कायदा हा मुळात मराठवाडयात लागू होत नाही यावरच आमचे ऑब्जेक्शन आहे. वेळ पडली तर आम्ही न्यायालयात सुध्दा दाद मागवू. सातारा, कोल्हापूर नाशिक , मुंबई जवळ ठाणे व पूणे येथे गुंठेवारी हा शब्द वापरला जतो. गुंठेवारीच्या क्षेत्रात जे काही प्लॉटीग वसाहती विशेषत: डोगरांच्या किंवा पहाडच्या पायथ्याशी जे आहे त्यास गुंठेवारी असे नाव दिलेले आहे. त्या ठिकाणी अनेक अनधिकृत वसाहती झालेल्या आहेत. यावर पावबंध घालण्यासाठी शासनाने एक आमदाराची कमेटी नियुक्त केली होती त्या कमेटीने या प्रकारचा अभ्यास केला परंतू हा अभ्यास करतांना मराठवाड्यातील जे शहरे आहे त्याचा अभ्यास त्याचा कमी प्रमाणात असावा. या शहरात अनेक प्राचीन पुराण वसाहती आहेत. जे गावठाण आहे १९६८ किंवा १९७५ चे असेल त्या भागास सुध्दा गुंठेवारीत घेतलेले आहे. या शहरात १९७१ पासून अनेक वसाहती या शहरात आहे. आणि या भागात तेंव्हा पासूनच अनेक सोयी सुविधा देण्यास सुरूवात झालेली आहे. या

भागातील लोक मालमत्ता कर पाणीपट्टी भरतात असे असतांना गुंठेवारी कायदा कोणत्या नियमानूसार लावणार आहोत याचा खूलासा झाला पाहिजे

मा. आयुक्त : गुंठेवारी हा पॉजेटीव्ह कायदा आहे. यात अनधिकृत बांधकाम हे रेग्यूलर करता येते. सन २००१ च्या पूर्वीच्या बाधकामास रेग्युलर करण्याची महापालिकेला परवानगी मिळाली आणि गुंठेवारीत केल्यानंतर बांधकाम करण्याची संधी मिळते. जेथे १०० टक्के गुंठेवारीचा भागत येतो किंवा ९० टक्के अनधिकृत भाग आहे तेथे विकास कामे करणार पण नाही. परंतू जुने शहर आहे. तेथे ५ ते १० टक्के अनधिकृत बांधकाम आहे तेथे विकास कामाचा फायदा त्या नागरीकांना देता येईल. तेथे काम थांबविता येणार नाही.ज्या भागात २० टक्के पेक्षा जस्त अनधिकृत घरे असेल तेथे काम करता येणार नाही व जेथे ८० टक्के घरे गुंठेवारीत रेग्यूलर झाले ते काम करता येईल.

श्री. मुजेब खान : २० टक्के पेक्षा जस्त बाधकाम कोणत्या भागात आहे त्याचा सर्वे करावा.

श्री.मो.जवेद मो.इसहाक : अनधिकृत बांधकामास मालमत्ता कर आकारला जतो. जे भाग अनधिकृत आहे तो गुंठेवारीत येईल असे म्हटले परंतू संपूर्ण शहरात ९० टक्के घरे ही अनधिकृत आहे. या वर्षात ७४४ घरांना परवानगी दिलेली आहे. चेलीपूरा लोटाकांरज. गुलमंडी, औरंगपूरा. शिल्लेखाना या भागात ९० टक्के अनधिकृत बांधकाम झालेले आहे त्यांना गुंठठेवारीत घेणार आहात काय?

मा. आयुक्त : परवानगी घेवून बांधकाम केले त्यास लिगल म्हणावे ज्यांनी परवानगीच घेतली नाही त्यास वेगळे समजवे. गुंठेवारी रेग्यूलाईज करण्यासाठी जे रक्कम घेतो ती यासाठी की त्याच पैशातून त्या भागाचा विकास करतो. ज्यांनी पैसेच भरले नाही तर इतर ठिकाणचे पैसे तेथे खर्च का करायचे.

श्री. त्र्यबंक तुपे : ज्या व्यक्तीचे घर हे २००१ पूर्वीचे असेल त्यांनी गुंठेवारीचे पैसे भरणा केले असेल व ते त्यास तोडून पुन्हा बांधावयाचे असेल तर त्यास कायद्यानूसार किती परवानगी देवू शकतो. गुंठेवारीत येवूनसूध्दा परवानगीसाठी जे काय फिस असेल ती भरण्यास तयार राहील. आजची परीस्थिती अशी की इमारत निरीक्षक हे पैसे घेतात व बांधकाम होवू देतात.

मा. आयुक्त :२००१ च्या पुर्वीचे घर असेल व एफएसआय कमी जस्त सोडला असेल तरी रेग्यूलाईज होते. परंतू तेच घर पाडून पून्हा बांधायचे असेल तर एफएसआय सोडूनच परवानगी देणार आहे.

श्री. त्र्यंबक तूपे : रितसर त्यांना पावती द्यावी व त्यांचे मनाने घर बांधण्याची परवानगी द्यावी. एफएसआय सोडल्यानंतर जगा कमी पडते.एफएसआय सोडून परवानगी देत असेल तर महानगपालिकेची परवानगीच तो व्यक्ती घेणार नाही अनधिकृत घर बांधेल.

श्री. संजय सिरसाट : गुंठेवारीत जे घरे झालेली आहे ती एक दुसऱ्याला लागून आहे. बाजूला तीन चार फुट सोडून बांधकाम परवानगी दिली तर तो व्यक्ती किती बांधकाम करेल.

मा. आयुक्त : एफएसआय सोडून परवानगी देता येईल.

श्री. संजय सिरसाट : २०× ३० मध्ये सर्व घराच्या भिंती एक दुसऱ्याला लागून असतात.जर जूने घर तोडून आरसीसीचे घर बांधायचे असेल तर परवानगी मागीतली तर ती कशी देणार पूर्ण जगेची देणार की एफएसआय सोडून देणार हा मुद्दा स. सदस्यांचा आहे.

मा. आयुक्त : प्रशासन हेच करणार आहे की जेआपण मंजूर केलेले नियमाप्रमाणे कार्यवाही करणार.

श्री. त्र्यबंक तूपे : जुने घर पाडून पूर्ण त्या जगेवर परवानगी न दिल्यास लोक अनधिकृत घरे बांधतील.

मा. आयुक्त : गुंठेवारी रेग्यूलाईज करतांना नकाशा घेवू त्याप्रमाणेच घर बांधकाम केले तर त्यास परवानगी देता येईल.

श्री मुजीब खान : १९८९-९० मध्ये या विषयावर सर्वसाधारण सभेत चर्चा झाली होती की २० × ३० च्या प्लॉटला परवानगी कशी द्यायची. त्यावेळी असे ठरले होते की महानगरपालिका या संबधी एक डिझाईन तयार करेल .कशा प्रकारे रूम्स राहतील व किचन कसे राहिल या बाबतीत डिझाईन महानगरपालिका देणार होते. त्यावेळी मा.मुन्शीलाल गौतम हे आयुक्त होते. त्यानूसार परवानगी देणार होते. परंतू त्यानंतर या बाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मा. आयुक्त : डी.सी. रूलप्रमाणे समोर व बाजूला जगा सोडणे बंधनकारक आहे. २०×३० चे प्लॉटवर पूर्णच बांधकाम करावयाचे असेल तर डी.सी. रूलमध्ये बदल करण्याची कार्यवाही सुरू करता येईल.

श्री.दिलीप गायकवाड : अनधिकृत मोबाईल टावरबाबत मी मागील बैठकीत मुद्या मांडला होता.आतापर्यत काय कार्यवाही केलेली आहे.

श्री. त्र्यंबक तूपे : शहरात जे पेट्रोल पंप आहे त्यांनी महानगरपालिकेची एनओसी घेतलेली आहे काय काही पंप हे धोकादायक सुध्दा आहेत. या बाबतीत काय कार्यवाही केलेली आहे याचाही खूलासा करावा.

मा. आयुक्त : पुढील बैठकीत या सबधीची माहिती दिली जईल.

मा. सभापती : विकासासंबधी अर्थसंकप्लात तरतूद होते, अंदाजपत्रक तयार होतात, टेंडर होते. ज्या दिवशी टेंडर असते त्या दिवशी बाजूच्या इमारतीमध्ये हाणामारीचे प्रकार होतात व रिंग हा प्रकार सुरू झालेला आहे. त्यामूळे विकास कामावर त्याचा परीणाम होतो. ३०० ते ४०० ठेकेदार या महापालिकेमध्ये झालेले असून काही ठेकेदार कोणतेही काम घेत नाहीत परंतू टेंडर फॉर्म घेतात. ज्याला काम घ्यायचे असते तो हा विचार करतो की किती टेंडर पर्चेस केलेले आहे. एक कामाचे टेंडर जतात २० परंतू अखरेच्या दिवशी टेंडर २ किंवा ३ टेंडर भरून येतात. माझ्या माहिती प्रमाणे १० टक्के रक्कम रिंग मध्ये वाटप केली जते. दहा लक्षचे काम असेल तर १ लक्ष रू. तो वाटते तर जर १० लक्षचे काम असेल तर त्यातून ६ लक्षच्या वर तो ठेकेदार काम करू शकतच नाही. त्यामूळे कामाचा दर्ज घसरतो. माझ्या वार्डात एका कामाचे २८ टेंडर गेले व एक टेंडर आले. असे टेंडर रद्दच केले पाहिजे डांबरीकरणाचे एक टेंडर होते. डांबरीकरणाचे नॉमस् आहेत. माझ्या माहिती प्रमाणे डांबरीकरणाचा साठा हा शहरापासून २५ कि.मी.च्या आत असला पाहिजे एका व्यक्तीने नगरचे लायसन्स आणले. कलर झेरॉक्स ५ रूपयात होते. टेंडर डाकूमेंन्ट घेतले त्यावर बोगस सहया केल्या सर्वांना रिंग मागण्याचा प्रयत्न केला कुणी रिंग दिली नाही. म्हणून एकदाचे टेंडर टाकून दिले. एक टेंडर आल्यामूळे ते रिकॉल करावे लागणार आहे मंजूर करता येणार नाही. याचाच अर्थ जे काम होणार आहे ते लांबणीवर पडणार आहे. जेंव्हा टेंडर पर्चेसींग होते तेंव्हा कार्य.अभियंता यांनी पूर्ण कागदपत्रांची तपासणी करून त्यांचेकडूनच हे टेंडर दाखल झाले पाहिजे हा जे गोंधळ चाललेला आहे तो थांबविण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.मुजेब खान : यामध्ये एकाच व्यक्तीची चूक नाही. यात अधिकारी तसेच काही नगरसेवकांची चूक आहे. तेथे बसून टेंडर टाकतांना दादागिरी केली जते. टेंडर टाकून देत नाही. टेंडर भरण्यासाठी स्वतंत्र अशी व्यवस्था करावी. जेथे दुसरे कूणी ही जणार नाही.

श्री.मो.जवेद मो.इसहाक : टेंडर भरतेवेळी तेथे दलाल लोक राहतात. त्या ठिकाणी झगडे होवू शकतात. त्यासाठी एक उपनिरीक्षक तसेच तीन पोलीस शिपाई संरक्षणासाठी मागणविण्यात यावे. टेंडर टाकतांना काहीच्या हातातून टेंडर हिसकावून घेतात. कोणी टेंडर टाकू लागले म्हणून दमदाटी करतात.

मा. सभापती : या सर्व बार्बींना आळा बसावा असे सर्व सदस्यांचे मत आहे. ज्या काही सूचना असतील त्या मा.आयुक्ताकडे कराव्या. अनेक टेंडर पर्चेस होतात परंतू दोन किंवा तीनच टेंडर येतात. त्यामूळे कामाची गुणवत्ता मिळत नाही हा एक भाग, ज्या वार्डात काम झाले त्या वार्डातील नगरसेवकांना किमान काम झाले याची कल्पना तरी द्यावी. समाधानकारक काम झाले तरच देयके अदा करावी अशी लेखा विभाग व चारही कार्यकारी अभियंता यांना सूचना आहे. इतर काही शासकीय विभागात इएमडी अगोदर दिल्यानंतर टेंडर फॉर्म दिल्या जतो. महानगरपालिकेनेही या पध्दतीची अमलबजवणी करावी. यामूळे ज्यांना खरेच काम करायचे आहे असेच लोक यामध्ये येतील. चांगली स्पर्धा होईल व कामाची गुणवत्ता मिळेल. या बाबतीत तंतोतंत पालन करण्यासाठी मा.आयुक्तांनी सर्वांना सूचना देण्याची गरज आहे. उद्या काही टेंडर आहे उद्यापासून या पध्दतीने अंमलबजवणीस सूरूवात करावी.

श्री.मुजेब खान : जे संबधीत अभियंता असतील त्यांनी स्थळ पाहणी करून कामाची गुणवत्ता तपासणी केली पाहिजे काही अधिकाऱ्यांना मालमत्ता कर पाणीपट्टीच्या वसूलीचे काम दिले. असे असेल तर साईट वर जवून काय तपासणी करतील. वसूली ही झोन कडेच असावी.

मा.आयुक्त : आम्ही ५ लक्षचे टेंडर फिजेकली आता घेणारच नाही. सर्व काही इंटरनेटद्वारे कार्यवाही होईल. अनामत रक्कम तसेच फॉर्म घेतल्या जईल. ज्या दिवसापर्यत भरायचे तीन वाजेपर्यत मूदत दिली जईल ४ वाजेला सर्वासाठी खूले राहिल.फिजेकल जे राहिल त्यात इन्कम टॅक्स प्रमाणपत्र व इतर कागदपत्र तपासणी करून घेतले जईल. प्रत्येक वेळेस तपासणी करण्याची गरजपडणार नाही.

श्री. त्र्यबंक तूपे : अधिकारी कर्मचारी यांना मोबाईल कार्ड दिले होते. ५० टक्के मोबाईल बंद असतात किमान कार्यालयीन वेळेत तरी चालू असावे.

डॉ. आशा बिनवडे : जेमोबाईल नंबर मध्ये बदल झालेला आहे त्याची यादी आम्हा सदस्यांना देण्यात यावी. पाणी पुरवठयातील सबओव्हरसिअर यांनाही ही मोबाईल देण्यात यावे.

मा. आयुक्त : स्थायी समितीने जे ठराव केला होता त्यामध्ये १० लक्षची लिमिट टाकलेली आहे. त्यामूळे सर्वांना देवू शकलो नाही. काही स.सदस्यांनी म्हटले होते की आम्हाला ग्रुपमध्ये यायचे आहे. आम्ही आपणांस म्हणू शकत नाही. स.सदस्यांनी पत्र द्यावे की माझे मानधनातून रक्कम वज करावे. त्या सदस्यांना मोबाईल ग्रुपमध्ये समावेश करून घेवू.

मा.सभापती : आताच स. सदस्य डॉ.आशा बिनवडे यांनी सूचना केल्याप्रमाणे त्या कर्मचाऱ्यांना मोबाईल देण्यात यावेत.

सौ. लता दलाल : चार दिवसापूर्वी डहाळे प्रकरण वृत्तपत्रात गाजले त्या ठिकाणी मी स्वत: जवून संबधीत विभागाचे अधिकारी यांचे सोबत पाहणी केली असता ४५ एकर जगा जवळपास आहे.

स्मृतीवनाची जगा आहे. तार कुंपन नाही. कुणीही यावे व अतिक्रमण करावे. स्थायी समितीने ५/२/२ अंतर्गत ताबडतोब मंजूरी देवून तेथे तांर कुपन करण्यात यावे.

मा. सभापती :४५ एकर जगा सुरक्षित राहण्यासाठी त्वरीत तार कुपन करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्र.175 :</u>**

दिनांक **24/11/2006** (का.प.क्र.15) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

डॉ. आशा बिनवडे : इतिवृत्त कायम करण्याचा विषय आहे. या शहरातील जनतेनी अत्यंत विश्वासाने लोकप्रतिनिधीत्व करण्यासाठी आपल्याला पाठविलेले आहे. आम्ही स्थायी समितीचे सदस्य म्हणून जबाबदार सदस्य आहोत. जनतेच्या पैशाची उधळपट्टी करण्यासाठी पाठविलेले नाही. जनतेचा पैसा कसा खर्च केला जतो यावर नियंत्रण करण्यासाठी पाठविलेले आहे. मागिल सभेचे इतिवृत्त मंजूर करतांना जेविषय, विषय पत्रिकेवर आले होते. ते आम्ही चर्चेअंती मंजूर करीत आहोत. खरा प्रश्न ऐनवेळच्या आलेल्या विषयांचा आहे. ही सभा आठ दिवसातून एकदा घेतली पाहिजेअसा नियम आहे. याचा अर्थ असा की प्रत्येक विषय हा विषयपत्रिकेवर यावा, त्यावर चर्चा करता यावी. ऐनवेळी विषय आणून ते कूठलीही चर्चा न होता मंजूर केले जवे हे आम्हाला मान्य नाही. मागिल बैठकीत ऐनवेळचे १६९,१७०,१७१,१७२,१७३ असे पाच विषय ऐनवेळी ३ मिनिटे अगोदर देण्यात आले आपण ऐनवेळचे अंदाजपत्रकाचे विषय आहे मंजूर करून राष्ट्रगिताने सभा लगेच संपविली. त्यावर आम्हाला अभ्यास करता आला नाही व चर्चा न होता ते विषय मंजूर करून इतिवृत्तात मान्य करणे हे आम्हाला योग्य वाटत नाही. जेत्या वेळेस घडले ते चूकच आहे आजही आम्हाला ते मान्य नाही. विषय क्र १६९,१७० ही अंदाजपत्रकाचे विषय नव्हतेच तर ती डायरेक्ट एजन्सीला काम देण्याचे विषय आहेत. या बाबत आयुक्ताशी चर्चा झालेलीआहे असे स्टेटमेन्ट आपण केले होते परंतू मा. आयुक्तांची केंव्हा मंजूरी झालेली आहे व आयुक्तांच्या मंजूरीशिवाय कार्य.अभियंता असे ऐनवेळी विषय ठेवू शकतात काय? ही आमच्या अधिकारावर आणलेली गदा आहे. अशा पध्दतीचे विषय आम्ही मंजूर करणार नाही. १७३ क्रमांकाचा विषय असा आहे की श्री. वाकेकर यांनी आपल्याकडे अपील केले आहे. त्यांना निलंबीत केले होते व तो जे कार्यकाळ आहे तो हक्काच्या रजेत रूपांतरीत करावा आणि कायमस्वरूपी रोखण्यात आलेली वेतनवाढ ही पूर्ववत करावी असा हा प्रस्ताव आहे. या विषयावर चर्चा या सभागृहात होणे आवश्यक होते. या कर्मचाऱ्याचे निलंबन का झालेले आहे त्यांचेवर कोणते आरोप होते. वेतनवाढ का रोखण्यात आली होती. त्याचे म्हणणे काय होते ज्यामुळे हे अपील मंजूर करावे. या प्रस्तावात विचारविनिमय करून निर्णय झाला असे म्हटले आहे परंतू कोणताही विचारविनिमय झालेला नाही व हा विषय मंजूर होवून इतिवृत्तात येतो हा सभागृहाचाच नाही तर लोकशाहीचा अपमान आहे. अशा प्रकारे सभागृहाचे कामकाजचालत असेल तर आम्ही या सभागृहात येवू इच्छित नाही. याचा अर्थ राहत नाही. दडपण आणून विषय मंजूर करून घेणे याचा मी निषेध करते.

मा. सभापती : मलाही काही बोलण्याचा अधिकार आहे. विषय क्र १६९,१७० हे संत एकनाथ रंग मदिरांच्या संदर्भाने विषय आहेत. संत एकनाथ रंग मंदीर त्वरीत सुरू करावे अशी अनेक नागरीकाची नगरसेवकांची मागणी होती. मा.महापौर यांनी स्वत: तेथे व्हिजीट करून जे काही काम असेल ते त्वरीत करावे अशा सूचना दिल्या होत्या त्यामूळे हे दोन विषय ऐनवेळी मंजूर करण्यात आले.

श्री. मुजेब खान : संत एकनाथ रंग मंदीरावर प्रत्येक वर्षी खर्च केले जत आहे. २५लक्ष, १२ लक्ष असे खर्च करण्यात आले.

डॉ. आशा बिनवडे : या प्रस्तावास मा.आयुक्तांची मंजूरी होती का, आयुक्तांच्या मंजूरीविना सभागृहात प्रस्ताव कसे आले.

कार्य. अभियता(विद्यु.) : मा. आयुक्तांची पुर्व मंजूरी घेवूनच हे प्रस्ताव ठेवण्यात आलेले होते. यापूर्वी किती खर्च झाला याची कल्पना मला नाही. या वर्षी संत एकनाथ रंग मंदीरासाठी २५ लक्षची तरतूद ठेवली होती. यात संत एकनाथ रंग मंदीराचे नुतनीकरण करावे असे सर्वसाधारण सभेनेच निर्णय घेतलेला आहे त्यानंतर या कामाचे टेंडर काढले आहे. त्या ठिकाणी बरेचशे कामही झालेले आहे बाहेरच्या बाजूने रंगरंगोटी करण्यात आलेली आहे. लाकडी स्टेजखराब झाले होते तेही नवीन केले आहे.

श्री.मधुकर सावंत : आतापर्यत यावर किती खर्च झालेला आहे.

कार्य.अभियंता विद्यु. : यात सिव्हिल कन्ट्रक्शनचे १० लक्ष तसेच एअर कुलींग तसेच एअर कर्टेन टाकलेले आहे ते ८.५० लक्ष तसेच माईक सिस्टीमवर ७ लक्ष, बाकी काम खुर्च्या बदलण्याचे आहे त्यासाठी निविदा काढलेल्या आहेत. तो सुध्दा आजच्या स्थायी समितीला ऐनवेळी प्रस्ताव आहे.

श्री. मुजेब खान : गेल्या वर्षीही हेच काम केले होते. डबल काम केले जते काय? प्राव्हेटेशन करावे. एवढा खर्च महानगरपालिका करू शकत नाही. त्यापासून तेवढे उत्पन्न मिळत नाही.

मा. आयुक्त : एअरकुलींग कधीच नव्हती तसेच स्टेज खराब झाले होते. अनेक वर्षापासूनचे होते ते बदलले आहे. फक्त मॅनेजमेन्ट प्रायव्हेटायझेशन करता येईल.

श्री. मधुकर सावंत : आताच खूलासा केला एकूण ५० ते ५५ लक्ष खर्च झाले असतील. दर दिवशी १० हजर रूपये असे गेल्या सात आठ महिण्यापासून चे जेउत्पन्न यायचे होते ते देखिल सात आठ लक्ष बुडीत झाले आहे. त्यामूळे ५० ते ५५ लक्ष रूपये खर्च करण्याचे कारण काय नेहमी तोटा होत आहे.

श्री. संजय सिरसाट : ऐनवेळच्या विषया संबधी स. सदस्या डॉ. बिनवडे यांनी त्यांचे म्हणणे मांडलेले आहे ते अत्यंत योग्य आहे. कारण सर्वसाधारण सभेत ऐनवेळचे प्रस्ताव हे नगरसेवकांचे असतात. त्यात कधी काय असेल म्हणून चर्चा झाली पाहिजेहे योग्य आहे. गेल्या अनेक दिवसापासून संत एकनाथ रंगमंदीरा बाबतचे वृत्तपत्रात वेगवेगळे छायाचित्र येतात. जे हौशी कलाकार, नाटयकर्मी आहेत किंवा प्रेक्षक आहेत त्यांना वाटते की नाट्यमंदीर आता लवकर सुरू होणार आहे. गेल्या पाच महिन्यापासून ते बंद आहे. जर एक दिवसाला १० हजर उत्पन्न असेल तर महिन्याला ३ लक्ष नुकसान होत आहे. असा त्यांचा सांगण्याचा उद्देश होता. ८ डिसेंबरला रंगमंदीर सर्वासाठी खूले करणार होते अशी घोषणा मा.महापौरांनी केली होती. आणखी खुर्च्याचा प्रश्न प्रलंबीत आहे. त्यामूळे ते खुले करण्याचे थांबलेले आहे. ३ लक्ष खर्चाचा विषय आहे हे करणे अत्यंत महत्वाचे आहे

असे प्रशासनाचे मत आहे. या शहराला आपल्याला ज्या सुविधा द्यायच्या आहेत त्यातील हा एक भाग आहे. मा.महापौरांनी सूचना केल्याप्रमाणे आले असेल तर ठिक आहे. यापूढे असे ऐनवेळचे विषय घेवू नये. यामूळे येणारे उत्पन्न व होणारा खर्च याचा विचार करून खरे पाहता तेथील उत्पन्नच महापालिकेला नाही. असे होत असेल तर खाजगीकरण करावे. ठराविक उत्पन्न येवू द्यावे. रिंग पध्दतीने तेथे प्रकार घडतात २५००/-रू. ची पावती घेतली तर वर्षभर चालते १०-१० कार्यक्रम त्या पावतीच्या आधारे घेतले जतात. कार्यक्रमाची तारीख घेतात ॲडव्हान्स घेतले जते. नंतर सांगण्यात येते की ही तारीख नको त्यामूळे तोटा होत आहे. म्हणून प्रायव्हेटायझेशन करावे.

मा. सभापती : प्रायव्हेटायझेशन करणे हा सर्वसाधारण सभेचा विषय होईल. या सभागृहाला निर्णय घेता येणार नाही.

श्री. संजय सिरसाट : स्थायी समितीला असे करण्याचे अधिकार आहेत.

श्री.मुजेब खान : तेथील खुर्च्या नेहरूभवन येथे आणण्यात येणार आहे असे म्हटले. दोन्ही मालमत्ता महापालिकेच्याच आहे नवीन फर्नीचर टाकण्यात यावे सावत्र नाते लावू नये.

डॉ. आशा बिनवडे : तेथे रंग मंदीराच्या बाहेर म्युरल्स लावून व तैलचित्र लावून कोणती सुविधा देणार होते त्याची तातडीची गरजहोती काय, हे विकासाचे काम नव्हते. की जेनागरीकांच्या दृष्टीने तातडीचे होते. असे ऐनवेवळचे विषय आम्हाला मंजूर नाही. माहिती देवूनच सभागृहासमोर आणावयास पाहिजेहोते.

मा. सभापती : जेकाही विषय येतात ते विकास कामाचे अंदाजपत्रक काही एजन्सी निश्चित करण्याचे विषय असतात. अशा विषयासाठी त्या त्या भागातील नगरसेवकांचा सातत्याने तगादा असतो की हे ऐनवेळी मंजूर करावे. माझ्या वार्डातील विषय आहे.

श्री. मुजेब खान : ऐनवेळी विषय दिले जतात अभ्यास होत नाही.

श्री.मधुकर सांवत : आपण त्यावेळी बोलताना म्हटले होते की हे अंदाजपत्रक आहे.

मा. सभापती : त्यावेळी एजन्सी निश्चित करण्याचे विषय आहे असे मी म्हणावयास पाहिजेहोते.

डॉ. आशा निबवडे : इतिवृत्त मंजूर करू नये किती सदस्यांचे मत आहे की मंजूर करावे. माझा यास विरोध आहे.

(याच वेळी स.सदस्य श्री.सावंत मधुकर, श्री.पुनमचंद बमणे डॉ.आशा बिनवडे तसेच श्री. मुजेब खान व श्री.दिलीप गायकवाड यांनी मा. सभापती यांचे डायस समोर जवून या विषयावर मतदान घ्यावे अशी मागणी केली.)

श्री. विनायक पांडे : इतिवृत्त मंजूर करण्यात यावे.

श्री.मो.जवेद मो.इसहाक : ऐनवेळी म्हणून मंजूर करू नये पुढील बैठकीत घेण्यात यावे.

मा. सभापती : ठिक आहे पुढील बैठकीत इतिवृत्त कायम करण्यात येईल.

सौ. लता दलाल : इतिवृत्त कायम करण्यात येते तेंव्हा त्यात दुरूस्ती काय आहे हे सुचवली जते नामंजूर करता येत नाही. ऐनवेळी प्रस्ताव येतो त्यावेळी हरकत घ्यावयास पाहिजे होती.

डॉ. आशा बिनवडे : बोलण्यास त्यावेळी संधी दिली नाही ऐनवेळी प्रस्ताव हातात दिले होते.

सौ. लता दलाल : यापुढे ऐनवेळचे विषयावर चर्चा करण्याची संधी द्यावी, इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा. सभापती : हे विषय वैयक्तीक नसून शहरातील विकास कामासंबंधीचे असतात. यापूढे ऐनवेळी विषय घेण्यासाठी आग्रह धरू नये. प्रशासनासही सुचना आहे कोणताही विषय स्थायी समितीच्या मंजूरीसाठी द्यावयाचा असल्यास तीन दिवस अगोदर देण्यात यावा. जेणे करून तो विषय पत्रिकेवर घेता येईल. विषय पत्रिकेवरील विषयालाच मंजूर दिली जईल. आजच्या इतिवृत्ताच्या विषयास मंजूरी द्यावी.

डॉ. आशा बिनवडे : इतिवृतास आजमंजूरी देवू नये. पुढील बैठकीत ठेवावे. बहुमताने विषय मंजूर करीत जवे. मंजूर करावयाचा असेल तर या सभागृहात आम्ही बसण्यास इच्छूक नाही.

मा. सभापती : पुढील बैठकीत विषयपत्रिकेवर हा विषय पुन्हा घेण्यात येईल.

**ठराव :**

हा विषय पुढील बैठकीत पुन्हा विषयपत्रिकेवर ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.176 :** (दि. 24.11.06 च्या स्था.स. बैठकीतील निर्णयानुसार- स्था.स.सभेतील विषय क्र.163)

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे गारखेडा येथील सर्व्हे नंबर 6 व 9 येथील अंतिम मंजूर रेखांकन नामे रोशन को.ऑप. हौसिंग सोसायटी मधील भूखंड क्रमांक 42 चे मिळकतधारक यांनी विनंती केली होती की, त्यांचा सदरील भूखंड हा सिडको हद्दीतील विकास योजना नकाशातील 30 मीटर रूंदीचा रस्ता विचारात घेऊन रेखांकनास मंजुरी देण्यात आली होती.

तथापी येथे या रेखांकनातील भूखंड क्रमांक 39 ते 42 च्या बाजुने मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची इमारत व संरक्षित भिंत बांधल्याने सदरील विकास योजना रस्ता रद्द झाला असून, या कारणाने त्यांचे भूखंडात सद्य:स्थितीत पुरेशा रूंदीचा म्हणजे 25 फुट रस्ता उपलब्ध होत नाही. सदरील अडचण ही लगत भूखंड क्रमांक 39, 40 साठीही होती. परंतु या भूखंडावर एकत्रितरित्या बांधकाम परवानगी घेऊन इमारत व कुंपण भिंत बांधण्यात आल्याने या भूखंडासाठी पोच रस्त्याची समस्या आजमितीस राहिलेली नाही.

या कारणाने त्यांनी याच रेखांकनातील भूखंड क्रमांक 23 च्या लगत असलेली खुली जागा जिचे क्षेत्र 858.00 चौ.मी. आहे त्यातून त्यांचे पूर्वीचे भूखंड क्रमांक 42 चे समतुल्य क्षेत्र म्हणजेच 666.00 चौ.मी. भूखंड स्वरूपात देण्यात यावा व त्यांचा भूखंड क्रमांक 42 व 41 च्या मागील बाजुच्या खुल्या जागेत समाविष्ट करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

स्थळ पाहणीत सदरील भूखंड धारकाची अडचण योग्य आढळून आल्याने त्यांचे विनंतीनुसार व सिडको विकास योजनेत 30.00 मीटर रूंद रस्ता वगळण्यात आल्याने त्यांची होत असलेली गैरसोय विचारात घेण्यात आली असून, त्यास विकास नियंत्रण नियमावलीतील कलम 6.6 खाली हार्डशिप अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

संबंधीताने भूखंड क्रमांक 42 च्या मागील खुल्या जागेचे क्षेत्र 1240.00 चौ.मी. त्यातून भूखंड क्रमांक 42 चा समावेश केल्यास खुल्या जागेचे क्षेत्र 1906 चौ.मी. होऊन भविष्यात सार्वजनिक उद्देशासाठी कामी येवू शकेल. तथापी उक्त नमुद प्रमाणे भूखंड धारकांची झालेली संबंधीताची विनंती मान्य करण्यास हरकत नसावी असे प्रशासनाचे मत आहे. त्यास्तव मा.स्थायी समितीने सदर प्रस्तावास मंजुरी द्यावी अशी विनंती आहे.

उक्त नमुद प्रमाणे खुल्या जागेत भूखंड प्रदान करण्यात येवून संबंधीतांना भूखंड रेखांकनातील खुल्या जागेत समाविष्ट करणेस सदर रेखांकनातील नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था नामे रोशन को.ऑप.हौसिंग सोसायटी औरंगाबाद यांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त असून सदर भूखंड अदलाबदल करणेसाठी येणारा दुरूस्त नोंदणीकृत दस्तऐवजाचा खर्च संबंधीत भूखंडधारक यांनी करावयाचा आहे.

करीता वरील प्रमाणे प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मधुकर सांवत : हा विषय स्थगित ठेवून उर्वरीत सर्व विषय मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती : हा प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदरील विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.177 :** (दि. 24.11.06 च्या स्था.स. बैठकीतील निर्णयानुसार- स्था.स.सभेतील विषय क्र.165)

दिनांक 31-10-2006 रोजी मा.सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका औरंगाबाद यांचे दालनात मालमत्ता कर वसुलीबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस उप आयुक्त(म) तसेच कर निर्धारक व संकलक, सहाय्यक आयुक्त तसेच सर्व प्रभाग अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती, स्थायी समिती यांनी प्रथम प्रत्येक प्रभाग कार्यालयाची मालमत्ता कर वसुली ही 42% होत आहे, यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच सर्व प्रभाग अधिकारी यांना मालमत्ता कर वसूली वाढविणेकरीता प्रयत्न करावेत. सन 2006-07 या आर्थिक वर्षात मालमत्ता कर वसूली ही कमीत कमी 70% व्हावी असे आदेशित केले.त्याकरीता उपाययोजना म्हणून ज्या वॉर्ड कार्यालयात वसूली कर्मचारी कमी आहेत अशा वॉर्ड कार्यालयात कर्मचारी देणे बाबत आदेशित केले. जे वॉर्ड अधिकारी त्यांना देण्यात आलेल्या उद्दीष्टापैकी कमी वसूली करतील त्यांचेविरूध्द दंडनीय कार्यवाही करण्यात येईल. तसेच जे वॉर्ड अधिकारी दिलेल्या उद्दीष्टापेक्षा जास्त वसूली करतील त्यांना केलेल्या उद्दीष्टावरील रक्कमेच्या 5%(पाच टक्के) रक्कम बक्षीस म्हणून देण्यात येईल.

**वॉर्डनिहाय थकबाकी व चालू मागणी तसेच त्यांना देण्यात आलेले दरमहा उद्दीष्ट खालील प्रमाणे आहे.**

| वॉर्ड कार्यालय | थकबाकी चालू मागणी रू.(आकडे कोटीत) | प्रतिमहा देण्यात आलेले उद्दीष्ट रक्कम रूपये |
|---|---|---|
| **अ** | 2.03<br>+ 1.83<br>**एकूण 3.86** | 80 लाख |
| **ब** | 2.68<br>+ 1.56<br>**एकूण 4.24** | 80 लाख |
| **क** | 2.18<br>+ 1.45<br>**एकूण 3.63** | 80 लाख |
| **ड** | 5.23<br>+ 3.40<br>**एकूण 8.63** | 1 कोटी 60 लाख |
| **इ** | 3.27<br>+ 1.15<br>**एकूण 4.42** | 80 लाख |
| **फ** | 6.77<br>+ 4.14<br>**एकूण 10.91** | 80 लाख |

मा.सभापती यांनी यापुढे प्रत्येक मालमत्ताधारकास दर तीन महिने, सहा महिने मागणी बील देणे बाबत कार्यवाही व्हावी तसेच रू.1 लाखापेक्षा वरील थकबाकी दारांकडून वसूली करणेकरीता मुख्य कार्यालयातर्फे एक वसूली पथक तयार करून वसूली करण्यात येईल असे आदेशित केले. मुख्य कार्यालयातील वसूली प्रमुख हे कर निर्धारक व संकलक राहतील. त्यांचे देखरेखीखाली वसूली पथक कार्यरत राहील.

तसेच मुख्य कार्यालयास वसूली प्रमुख कर निर्धारक व संकलक यांना अतिरिक्त कर्मचारी, वसूली करणे करीता देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. मालमत्ता कर वसूली केल्याखेरीज शहरात विकासाची कामे करणे शक्य होणार नाही, असे सूचित करून जास्तीत जास्त वसूली करणे करीता प्रयत्न करण्याची गरज असल्याबाबत सांगितले. तसेच करमुल्य निर्धारण विभाग पुर्ववत चालू करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार करमुल्य निर्धारण अधिकारी, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, दुय्यम आवेक्षक, इ. कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून हा विभाग पुर्ववत सुरू करण्याची कार्यवाही करावी. तसेच महानगरपालिकेमध्ये इमारत निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक, कर निरीक्षक ही पदे कार्यरत असून या सर्वांचे पदनामात बदल करून **महापालिका निरीक्षक** म्हणून पदनाम देण्यात यावे. तसेच महापालिका निरीक्षकांकडून कर वसूलीचे काम, शहरातील विना परवाना होत असलेल्या बांधकामावर नियंत्रण ठेवणे इत्यादी कामे त्यांचेकडून करून घेण्यात यावीत. त्याच्या मदतीला एक कनिष्ठ लिपिक व चतुर्थश्रेणीतील चार कर्मचारी देण्यात यावेत. त्याचप्रमाणे महापालिका निरीक्षकांना वरील दर्शविलेल्या कामासाठी आवश्यक अधिकार प्रदान करण्यात यावेत. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

सौ.लता दलाल : वार्ड कार्यालय-अ मध्ये श्री.मोहमद खान हे वार्ड अधिकारी असून श्री.सोनवणे यांचेकडे वार्ड अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार आहे. वॉर्ड ब कार्यालयात श्री.सुर्यवंशी व श्री.फारूकखान हे सुध्दा अतिरिक्त कार्यभार पाहतात. वार्ड क मध्ये श्री खालेद व श्री. राठोड हे दोघेही अतिरिक्त कार्यभार पाहतात. वार्ड ड मध्ये श्री. वाहूळ व खन्ना हे कायम स्वरूपी काम पाहतात. वॉर्ड फ कार्यालयात श्री. पाटणी हे ही अतिरिक्त कार्यभार पाहतात. ५०% अधिकारी हे अतिरिक्त कार्यभार पाहत असतील व त्यांना वसुलीचे काम देत असू तर व सेवा कामकाजनुसार नियम असतात ते तुम्ही कसे लावू शकता.

श्री.संजय सिरसाट : या प्रस्तावात त्यांना दंडनीय कार्यवाही करण्यात येईल व उद्दीष्टापेक्षा जस्त वसूली केल्यास ५ टक्के रक्कम बक्षीस म्हणून देण्यात येईल असे प्रस्तावित केले. दंडनीय मध्ये किती टक्के आहे.

करमुल्य निर्धा. व संकलक : महानगरपालिकेची कर वसुली समाधानकारक नसल्यामूळे कर्मचाऱ्यांना काही फायदे द्यावे काय, कर्मचाऱ्यांना फायदे सवलती दिल्यास वसूलीत वाढ होईल. हा विषय मा. महापौर, मा. सभापती व मा. आयुक्त यांचे चर्चेत आलेला होता. मागिल वर्षाची वसूली पेक्षा या वर्षी जी काही जस्त वसूली होईल त्यावर टक्केवारी प्रमाणे कर्मचाऱ्याना काही इन्सन्टीव्ह द्यावा असे प्रस्तावित आहे.

श्री. मुजीब खान : वार्ड अधिकारी तसेच वार्ड अभियंता यांचेकडे कोणती कामे आहेत, दिवसभर कार्यालयात बसून असतात. त्यांचेकडे वसूलीचे काम द्यावे. झोन कार्यालयात भेट दिली तर कुणीही कर्मचारी दिसून येत नाही.

श्री. त्र्यंबक तूपे : या प्रस्तावात महापालिका निरीक्षक म्हणून पदनाम द्यावयाचे असून अधिकार द्यायचे आहे असे नमूद आहे. एक इमारत निरीक्षक नागरीकांना त्रास देतात हा

प्रस्ताव मंजूर केल्यास हे तीन तीन कर्मचारी नागरीकांना वेठीस धरतील. रद्द करण्यात यावे.

मा. सभापती : सदर प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे.

**विषय क्र.178 :** (दि. 24.11.06 च्या स्था.स. बैठकीतील निर्णयानुसार- स्था.स.सभेतील विषय क्र.166)

सिडको हडको मधील मालमत्तांना कर आकारणी करणे बाबत आयुक्त, महानगरपालिका खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहेत.

अ) सेवाशुल्क भरल्याची रक्कम एकुण मागणी मधून कमी करावी (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 152 प्रमाणे निर्लेखित करावी- कारण महानगरपालिकेने त्या सेवा पुरविलेल्या नाहीत.)

ब) थकबाकी ही पाच समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात यावी.

जर एखाद्या व्यक्तीला/मालमत्ता धारकाला वरील प्रमाणे थकबाकी देणे मान्य नसेल तर त्यांना आजच्या दराने करयोग्य मुल्य लावण्यात येईल.

**प्रस्तावाच्या अनुषंगाने सिडको हडको मधील मालमत्तांना कर आकारणी करणे संदर्भात संक्षिप्त टिप्पणी.**

औरंगाबाद महानगरपालिकेकडे सिडकोचे हस्तांतरण दि.01-04-2006 पासून झालेले आहे. या भागातील मालमत्तांना कर आकारणी करून वसूली होणेसाठी व पर्यायाने महानगरपालिकेस भविष्यात विकास कामे करण्यासाठी, आर्थिक उत्पन्न प्राप्त होणेसाठी कर आकारणी करणे आवश्यक आहे.

ज्या वर्षीपासून सिडको क्षेत्र महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेले आहे त्या वर्षापासून सिडकोमध्ये कराची आकारणी करणे गरजेचे होते. दिनांक 01-04-2006 पासून महानगरपालिकेचे सिडको द्वारा देण्यात आलेली सेवा हस्तांतरीत करून घेतलेली आहे. परंतु अधिकृतरित्या सिडको हा क्षेत्र पूर्वीपासूनच महानगरपालिकेच्या अंतर्गत होता, फक्त सिडको ही संस्था सेवाशुल्क लावून सेवा देत होती.

सर्वसाधारण सभेमध्ये झालेली चर्चा व शासन स्तरावर वेळोवेळी झालेल्या बैठकांमध्ये या धोरणाला मान्यता मिळालेली आहे, की सिडकोमध्ये असलेल्या मालमत्तांना ज्या वर्षी त्यांचे बांधकाम झालेले असेल त्या वर्षीचे करयोग्य मुल्य धरून कराची आकारणी करावी.

वरील दोन्ही परिस्थितीत बघता खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

1. ज्या मालमत्तेला बांधकाम परवानगी आहे आणि बांधकाम परवानगी प्रमाणेच बांधकाम केलेले आहे त्या मालमत्तेला-
   - ❖ जर भोगवटा प्रमणपत्र घेतले असेल तर त्या तारखेपासून त्यावर्षी असलेल्या दराप्रमाणे करयोग्य मुल्य आकारण्यात येईल व त्या वर्षीपासून आजपर्यंत एकूण मालमत्ता कर-सेवा शुल्क वगळून- पुढील पाच वर्षामध्ये समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात येईल.
   - ❖ जर भोगवटा प्रमाणपत्र घेतले नसेल तर बांधकाम परवानगीच्या दिनांका पासून एक वर्षानंतरच्या तारखेपासून करयोग्य मुल्य निश्चित करावे व वरील प्रमाणे समान हप्त्यामध्ये वसुली करण्यात येईल.
2. ज्या मालमत्तांना अधिकृतरित्या बांधकाम परवानगी घेवून बांधकाम करण्यात आलेले आहे परंतु अतिरिक्त किंवा बांधकाम परवानगीच्या व्यतिरिक्त बांधकाम झालेले आहे त्यासाठी बांधकाम परवानगीप्रमाणे असलेल्या क्षेत्राला वरील प्रमाणे(1) व अतिरिक्त बांधकामाला आजच्या दराने करयोग्य मुल्य आकारण्यात येईल.
3. ज्या मालमत्तांचे पूर्णपणे अनाधिकृतरित्या बांधकाम आहे त्यांना सध्याच्या प्रचलीत धोरणाप्रमाणे (अनाधिकृत बांधकामाचे दराने) करयोग्य मुल्य लावण्यात येईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

मा. आयुक्त :सिडको महानगरपालिकेकडे ऑफिशियली केंव्हा हस्तांतरण झाले हा कायदेशीर मुद्दा आहे. १ एप्रिल पासून फक्त सेवा ताब्यात घेतलेली आहे. परंतु सिडको जेंव्हापासून अस्तित्वात आले आहे तेंव्हापासून तेथील नागरीक त्यांचे प्रतिनिधी महानगरपालिकेत निवडून देतात. तेंव्हापासून सिडको महानगरपालिका क्षेत्रामध्ये आहे. फक्त तेथील सेवा ही सिडको देत होती. नियमाप्रमाणे त्या दिवसापासून मालमत्ता कर लावणे गरजेचे होते. १९९४-९५ च्या दरम्यात सर्वसाधारण सभेने निर्णय घेतला की सिडको भागात मालमत्ता कर लावणार नाही. परंतू ॲक्टमधील तरतुदीनुसार मालमत्ता कर लावावा लागेल. सुविधा १ एप्रिल पासून ताब्यात घेतलेली आहे. सिडको भागात या वर्षापासून मालमत्ता कर लावल्यास त्यांचेवर फार मोठा बोज येईल असे काही सदस्यांनी तसेच लोकप्रतिनीधीनी सुध्दा म्हटले होते. जर १९९५ मध्ये शहरात एखाद्या व्यक्तीने घर बांधले असेल तर कर कमी येईल तेच घर सिडकोमध्ये असेल तर कर जस्त येतो. असे व्हायला नको म्हणून प्रस्ताव ठेवलेला आहे. एनआरव्ही ठरविण्याचे अधिकार प्रशासनास आहेत. मालमत्ता कर ठरविण्याचे अधिकार सभागृहाला आहे. इन्स्टॉलमेन्ट प्रमाणे वसूल करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत. स्थायी समितीच्या मान्यतेने हप्त्याने प्रशासन वसूली करू शकते. हा जे प्रस्ताव ठेवला आहे तो इन्स्टॉलमेंटसाठी ठेवलेला आहे. सिडको भागात एखाद्या व्यक्तीने घर बांधले असेल व त्याच क्षणी शहरामध्ये एखादे घर झाले असेल तर दोघांनाही समान बोज पडावा. जर इमारत परवानगीची तारीख असेल व त्यावेळेला जेकरयोग्य मुल्य आकारण्याचा प्रशासनाचा प्रोसीजर होते. त्याप्रमाणे लावून जे सेवा कर भरलेला आहे तो वज करून उर्वरीत ही रक्कमपाच हप्त्यात वसूल केली जईल यासाठी प्रस्ताव आलेला आहे. जर ९४ चा दर लावायचा नाही आजच्या दराने लावायचे तर तोही लावता येईल. सन २००६ चा करयोग्य मुल्य लावावे हा एक भाग झाला किंवा ज्या वर्षी घर झाले तेंव्हापासून कर आकारणी करून सेवा कर वज करता उर्वरीत रक्कम पाच हप्त्यात वसूल करावी, हा दुसरा मार्ग. प्रशासनाचे असे मत आहे की, ज्या वर्षी त्या इमारतीचे बांधकाम झाले त्या वर्षापासून कर आकारणी करू जर आपण म्हणत असाल की १९९४ चे दर आकारू व आजपासून लावू तर नियमानुसार तसे करता येणार नाही.

सौ. लता दलाल : सिडको भागातून १९८८ पासून लोकप्रतिनिधी निवडूण आलेले आहे व तेंव्हापासून सिडको महानगरपालिकेकडे आहे व तेंव्हापासून कर आकारावा हे अत्यंत चूक आहे. १९९५ एक ठराव आला होता तेंव्हा मी सदस्य होते. सिडकोला कोणत्याही सोयी सुविधा महापालिका देत नाही म्हणून मालमत्ता कर लावता येणार नाही.जेंव्हा पासून सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतर झाले तेंव्हा पासून म्हणजेच सन २००६ पासून कर लावण्यात यावा.

मा. आयुक्त : टॅक्स आणि चार्जेस मध्ये अंतर आहे. महानगरपालिका क्षेत्रात जे घर असेल तेथे कर लागतो. टॅक्स आणि सुविधेचा संबध नसतो. चार्ज आणि सुविधेचा संबध असतो. चार्ज शासन लावू शकते. महानगरपालिका लोकल गव्हरमेंन्ट आहे म्हणून कर लावू शकते.

सिडको गव्हरमेंन्ट नाही म्हणून टॅक्स लावू शकत नाही. सिडको सेवा कर लावत असे. १९९५ ला ठराव घेतला की आपण मालमत्ता कर घेणार नाही हे नियमात बसत नाही. टॅक्सचे दर शुन्य करा ही बाब वेगळी होते. परंतू कर लावता येणार नाही हे म्हणणे चूकीचे आहे. सुविधा दिली नाही म्हणून कर लावायचा नाही अशी तरतुद ॲक्ट मध्ये नाही.

सौ. लता दलाल : सर्व सुविधा देतो म्हणून मालमत्ता कर लावला जतो. महानगरपालिका तेथे सुविधा देत नव्हते म्हणून कर लावत नव्हतो.

मा. आयुक्त : सेवा कर वज करून मालमत्ता कर जेंव्हापासून घर झाले तेंव्हापासून घ्यावे नसता आजच्या दर आजपासून आकारणी केल्यास जस्त बोज पडेल व कायम स्वरूपी राहिल. मागचे रेट लावण्याचे अधिकार नाही मागचे रेट यामूळे लावत आहे की नागरीकांवर बोज कमी पडावा. याद्वारे लोकांना पर्याय देत आहे.थकबाकीचे हप्ते करून देण्यासाठी आपल्या कडे हा प्रस्ताव आलेला आहे.

श्री.मुजीब खान : मागचा कर लावण्याचा अधिकार नाही. जेंव्हा पासून महापालिकेकडे आले तेंव्हापासून आकारण्यात यावे

श्री. मधुकर सांवत : सिडकोची घरे ही लिजवर आहेत. त्यांना मालकी हक्क हा आज नाही ९९ वर्षानंतर मिळणार आहे. सन २००६ पासून महानगरपालिकेत सिडको हस्तांतरण झालेले आहे तेंव्हापासून व कमी कर आकारण्यात यावा.

श्री.संजय सिरसाट : सिडको ही एक संस्था आहे, डेव्हलपर एजन्सी आहे. ज्या वेळेस त्या भागाचा विकास केला तेंव्हा सुविधा देणे सिडकोचे काम होते. परंतू त्यांचेकडे यंत्रणा नसल्यामुळे सहानुभूती दाखवून पाणी पुरवठा योजना महानगरपालिकेकडे घेतली. त्यावर खर्चही केलेला आहे. ती वसूली सिडकोकडून महापालिकेने वसूली केली नाही. जर एखादा घरमालक किरायाने घर देतो व स्वत: राहतो तर जस्त कर आपण आकारतो. जर मालकच राहत असेल तर कमी कर आकारला जतो. सिडकोतील लोक हे त्यांचे घर असून किरायाने राहतात ९९ वर्षाच्या लिजवर ते घरे आहेत. मालकी प्रस्तावित नाही. ते आजही मालक नाही.

मा. आयुक्त : सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे की करयोग्य मुल्य ठरवितांना रेन्ट विचारात घेणार नाही. म्हणजे आपण रेन्टवर दिले असेल किंवा नसेल समान कर या वर्षापासूनआकारणार आहोत.

श्री.मुजीब खान : सिडकोच्या अनेक ओपन स्पेस आहेत, आज त्याचे संरक्षण करण्यास कुणी नाही. ते हस्तांतरण झाले का याचा खुलासा होत नाही. महापालिका परवानगी देते तर सिडकोची एनओसी घेण्याची गरजका पडते.

मा. आयुक्त : सिडको हे महानगरपालिकेकडे ८२ पासून आहे. सिडको सेवा देत होते म्हणून सेवा कर आकारला जत असे. सिडकोची एनओसी घेत नाही ना हरकत प्रमाण पत्र घेतो, जेकी काही थकबाकी असू नये.

कर निर्धा.व संकलक : आजचे रेट हे बांधकामाचे क्षेत्रावर ९.५० रू. आहे. सिडकोमध्ये ७.५० ते ८.५० रूपर्यापर्यत जईल. २००० पूर्वी दर ४.५० रूपये होता. आणि सन १९८८ पूर्वी ४.१० रूपये असा होता. जर एखादया व्यक्तीचे सन १९८८ ला घर बांधले असेल तर आजच्या दर आकारल्यास ३००० रूपये पर्यत जईल. जर सन १९८८ चा दर लावायचा असेल तर भविष्यातही कर कमी राहील. यामुळे सर्व शहराला समान न्याय देता येईल.

मा. सभापती : विषय असा आहे की जुन्या रेटनी कर आकारणी करायची की आजच्या रेटनी हा अधिकार समोरच्या व्यक्तीला आपण देत आहोत. कोणता कर भरायचा हा अधिकार समोरच्या मालकाचा आहे.

श्री.मुजीब खान : जेव्हा पासून हस्तांतरण झाले तेव्हापासून कर लावण्याचा अधिकार हा नियमानुसार येतो.

मा. सभापती : संबधीत नागरीकांना जे कमीत कमी दर वाटेल तो त्यांनी भरणा करावा. या विषयास मंजूरी देण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको हडको मधील मालमत्तांना कर आकारणी करणे बाबत प्रस्तावात दर्शविण्यात आलेल्या मुद्यांनुसार व खालील नमुद करण्यात आल्याप्रमाणे, सिडको भागातील मालमत्ता धारकास देण्यात आलेल्या पर्यायाप्रमाणे कर आकारून वसुली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अ) सेवाशुल्क भरल्याची रक्कम एकुण मागणी मधून कमी करावी (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 152 प्रमाणे निर्लेखित करावी)

ब) थकबाकी ही पाच समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात यावी.

जर एखाद्या व्यक्तीला/मालमत्ता धारकाला वरील प्रमाणे थकबाकी देणे मान्य नसेल तर त्यांना आजच्या दराने करयोग्य मुल्य लावण्यात येईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.179 :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग)यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67(अ) च्या तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रतिवर्षी पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल तयार करणे आवश्यक असून अहवाल प्रतिवर्षी दि.31 जुलै पुर्वी प्रसिध्द करणे बंधनकारक आहे.

सन 2003-04 ह्या वर्षी पर्यावरण अहवाल तयार करण्यासाठी पुणे स्थित मशाल या संस्थेला रू.1.50 लक्ष इतक्या रक्कमेत संमती दिली होती व पर्यावरण अहवाल तयार करून घेतला होता. सन 2004-05 चा पर्यावरण अहवाल तयार करण्यासाठी मशाल संस्थेने रू.1.35 लक्ष रक्कमेत तयारी दर्शविली होती. त्यानुसार मा.स्थायी समिती सभेने दि.20-7-2005 रोजी झालेल्या सभेत मान्यता प्रदान केली होती. त्यानुसार दि.25-7-2005 रोजी मशाल संस्थेस पर्यावरण अहवाल सादर करण्यासाठी कार्यादेश देण्यात आले होते. तथापी संस्थेने मुदतीपुर्वीच म्हणजेच 31-7-2005 पुर्वी पर्यावरण अहवाल सादर केला नाही. मशाल संस्थेशी वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही संस्थेने सन 2005-06 चा पर्यावरण अहवाल सादर केला नाही. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेस सन 2005-06 चा पर्यावरण अहवाल 31 जुलै 2006 पुर्वी प्रसिध्द करणे शक्य झाले नाही.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे पत्र क्र.GECA/CED/ENV/06/6104 दि.28/11/2006 प्राप्त झालेले असुन संस्थेने शहराचा सन 2006-07 चा पर्यावरण अहवाल पुर्वीच्या मंजुर दरात म्हणजेच रूपये 1.35 लक्ष इतक्या रक्कमेत करण्याची तयारी दर्शविली आहे. शाकीय अभियांत्रिकी महाविद्यालय ही स्थानिक व मान्यताप्राप्त संस्था असून संस्थेने यापुर्वी AICTE, MPSP, PMGSY व महानगरपालिका औरंगाबाद साठी विविध प्रकल्प तयार केलेले आहेत. मशाल संस्थेचा नकारात्मक दृष्टीकोन लक्षात घेता सन 2006-07 ह्या वर्षीचा पर्यावरण अहवाल पुर्वीच्या मंजुर दरात म्हणजेच रूपये 1.35 लक्ष इतक्या रक्कमेत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद ह्या शासकीय संस्थेकडुन करून घेण्याबाबत मा.आयुक्तांनी

दि.1-12-2006 रोजी मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव शिफारस केली आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल 2006-07 ह्या वर्षीचा पर्यावरण अहवाल पुर्वीच्या मंजुर दरात म्हणजेच रूपये 1.35 लक्ष इतक्या रक्कमेत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद ह्या शासकीय संस्थेकडुन करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.180 :**

मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील औद्योगिक वसाहतीतील एकूण 640 कंपन्यांपैकी 395 कंपन्या पूर्णत: बंद आहेत. यापैकी 245 कंपन्या सद्य:स्थ्थितीत चाीलू असल्या तरी त्यापैकी 60 ते 65 कंपन्या अंशकालीन (आजारी) बंद असतात व तसेच दरवर्षी औद्योगिक वसाहतीतील कंपन्या बंद पडण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे महानगरपालिका हद्दीतील कंपन्यांपासून दरवर्षी मिळणाऱ्या जकात उत्पन्नात घट निर्माण होत आहे.

वरील बाबी संदर्भात व मनपाच्या एकूण उत्पन्नाचा विचार केल्यास मनपाचे आर्थिक उत्पन्न टप्प्याटप्प्याने वाढविणे आवश्यक आहे. त्यापैकी प्रथम औरंगाबाद मनपा हद्दीमध्ये प्रवेश करणाऱ्या व शहराबाहेर जाणाऱ्या वाहनांसाठी "रहदारी फी" (ट्रांझीट फी) मध्ये वाढ करणे आवश्यक असून त्यानुसार सद्य:स्थितीत शासन निर्णय क्र.एएमसी-1003/3258/प्र.क्र.-347/03/नवि-24, मंत्रालय, मुंबई-32, दिनांक 6 मे 2004 अन्वये प्रत्येक वाहनासाठी "रहदारी फी" (ट्रांझीट फी) रूपये 50/-(रूपये पन्नास फक्त) आकारण्यात येत आहे. यापासून सन 2005-2006 या आर्थिक वर्षात मार्च अखेर रूपये 4.98 कोटी महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे.

औरंगाबाद शहरात प्रवेश करणाऱ्या आणि शहराबाहेर जाणाऱ्या वाहनावर रूपये 50/-(रूपये पन्नास फक्त) प्रति वाहन ऐवजी रूपये 100/-(रूपये शंभर फक्त) अशी वाढ करणे आवश्यक असून या वाढीमुळे महानगरपालिकेस दरवर्षी सरासरी रूपये 5.00 कोटीचे अतिरिक्त उत्पन्न मिळेल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 127, 142 व 147 मधील तरतुदी नुसार "औरंगाबाद महानगरपालिका स्थायी आदेश 1984" मधील अनुसूची -"एम" मधील रहदारी फी रूपये 50/-(रूपये पन्नास फक्त) वरून रूपये 100/-(रूपये शंभर फक्त) अशी वाढ करण्यास महानगरपालिका अधिनियमातील कलम-466 (1) च्या (अ) मधील (फ) व (2) अन्वये रहदारी फी मध्ये वाढ करणे करीता मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

मा. आयुक्त : जे गाडी शहर पास करून जईल त्यांचेसाठीच आहे. मार्च पासून याची अमबजवणी होणार आहे.

मा.सभापती : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 127, 142 व 147 मधील तरतुदी नुसार "औरंगाबाद महानगरपालिका स्थायी आदेश 1984" मधील अनुसूची -"एम" मधील रहदारी फी (ट्रांझीट फी) रूपये 50/-(रूपये पन्नास फक्त) वरून रूपये 100/-(रूपये शंभर फक्त) अशी वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.181 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दि.22-11-2006 ते 29-11-2006 या कालावधीत औरंगाबाद चिकलठाणा विमानतळ येथून सुमारे 2000 यात्रेकरू टप्प्या टप्प्याने हज यात्रेस जाणार आहेत. सदर ठिकाणी प्रत्येक विमान प्रयानाच्या वेळेस यात्रेकरू व त्यांचेसह नातेवाईक, मित्रमंडळी जमा होणार आहेत. त्यानुसार सदरील ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने विविध सुविधा पुरविण्याबाबत मा.विभागीय आयुक्त यांच्याकडे दि.6-11-2006 रोजी संपन्न झालेल्या बैठकीत आदेश देण्यात आलेले आहेत.

त्या अनुषंगाने जामा मस्जीद येथे साफसफाई व विमानतळ परिसर या ठिकाणी तात्पुरते शौचालय व विद्युत व्यवस्था करणे करीता रक्कम रू.1,20,000/- चा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च अर्थसंकल्पीय पुस्तिका सन 2006-07 आकस्मिक इतर किरकोळ खर्च या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र. एम-45 अ.क्र.12 अन्वये ठेवण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल.

तसेच सदरील कामाची तातडी पाहता सदरील काम हे उपलब्ध गुत्तेदारामार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.संजय सिरसाट : विमान तळ हे वेगळे प्राधिकरण आहे. हजयात्रेसाठी नागरीक जणार आहेत. धार्मीक स्थळी जणार आहेत. याप्रमाणेच कर्णपूरा येथील यात्रा व सातारा येथील खंडोबाची यात्रा भरते तसेच बुध्द लेणी येथे सूध्दा यात्रा भरते ते सूध्दा यात समाविषट करण्यात यावे. याची पण ठराविक तारीख असते.

मा.सभापती : पुढील वर्षी सर्व यात्रेच्या ठिकाणी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकत्रित टेंडर काढावे. ठराविक तारखांना यात्रा होत असतात. त्याप्रमाणे कार्यवाही करावी. याप्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार हज यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी जामा मस्जीद येथे साफसफाई व विमानतळ परिसर या ठिकाणी तात्पुरते शौचालय व विद्युत व्यवस्था करणेचे रक्कम रू.1,20,000/-चे काम या कामाची तातडी पाहता सदरील काम हे उपलब्ध गुत्तेदारामार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच पुढील वर्षी सर्व यात्रांचे ठिकाणी सुविधा पुरविण्याकरीता एकत्रित टेंडर काढण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.182 :**

प्रस्ताव सादर करण्यात यचेतो की, औरंगाबाद महानगरपालिका संचलित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे श्री.जनार्दन उध्दवराव सोनवणे यांची मानद समन्वयक म्हणून 11 महिन्याकरीता मानधन रू.5000/- व करार पध्दतीवर नियुक्ती करण्यास मा.स्थायी समितीने ठराव क्र.65 दि.27-9-2005 अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दि.13-10-2005 च्या आदेशानुसार संबंधीताची नियुक्ती मानद समन्वयक म्हणून 11 महिन्याच्या मानधन व करार पध्दतीवर विविध अटींच्या अधिन राहून करण्यात आली. याप्रमाणे श्री.जनार्दन सोनवणे यांना दि.15-10-2005 रोजी सदर पदावर रूजू करून घेण्यात आले. या मुदतवाढीचा कालावधी दि.15-9-2006 रोजी संपलेला आहे.

श्री.जनार्दन सोनवणे, मानद समन्वयक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद यांना पुढील 11 महिन्याची मुदतवाढ देण्याबाबत त्यांच्या विभाग प्रमुखांनी शिफारस केलेली आहे. त्यानुसार संबंधितांना पुढील 11 महिन्याची मुदतवाढ मागील देण्यात आलेल्या आदेशातील अटी व शर्तीस अधिन राहून प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री. मुधकर सांवत : उशीरा प्रस्ताव का आलेला आहे.

मा. सभापती : पुढच्या वेळेस वेळेवर प्रस्ताव सादर करावा. मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका संचलित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे श्री.जनार्दन उध्दवराव सोनवणे यांना मानधन रू.5000/- व करार पध्दतीवर मानद समन्वयक म्हणून संबंधितांना मागील देण्यात आलेल्या आदेशातील अटी व शर्तीस अधिन राहून दि.15-9-2006 पासून पुढील 11 महिन्याची मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.183 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती परमजीत कौर गुरूमुख सिंग सैनी, परिचारिका, आरोग्य विभाग ह्या दि.26-4-1993 पासून सतत विनापरवानगी गैरहजर आहेत. त्यांना कामावर रूजू होण्याबाबत वेळोवेळी लेखी नोटीस दि.12-7-1993 व 18-3-1996 ला देण्यात आली होती. परंतु संबंधीतानी कार्यालयाने पाठविलेल्या नोटीसला काही एक प्रतिसाद दिला नाही अथवा कार्यालयास लेखी कळविलेले नाही.

संबंधिताचा गैरहजेरीचा एकूण कालावधी आजपर्यंत 13 वर्ष 7 महिने आहे. सदरील कर्मचारी ह्या मुळ सेवा पुस्तिकेत नमूद निवासी पत्त्यावर उपलब्ध नसल्यामुळे त्यांना आपली बाजू मांडण्याची अंतिम संधी म्हणून दि.1-11-2006 च्या दैनिक लोकमत, सामना, सकाळ, पुण्यनगरी, गांवकरी, औरंगाबाद टाईम्स(उर्दू) या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करून 15 दिवसात समक्ष हजर होवून स्पष्टीकरण सादर करण्याबाबत

अंतिम संधी देण्यात आली होती. दि.16-11-2006 रोजी अंतिम मुदत संपल्यानंतरही संबंधिताकडून काही एक खुलासा प्राप्त झालेला नाही.

करिता श्रीमती परमजीत कौर गुरूमुख सिंग सैनी, परिचारिका, आरोग्य विभाग ह्या दि.26-4-1993 पासून विनापरवानगी सतत गैरहजर असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 3, म.ना.सेवा(रजा) नियम 1981 चे कलम 48(2) चा भंग झालेला असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 (2) (ग) अन्वये त्यांना महानगरपालिकेच्या सेवेतून कायमचे कमी करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती परमजीत कौर गुरूमुख सिंग सैनी, परिचारिका, आरोग्य विभाग ह्या दि.26-4-1993 पासून विनापरवानगी सतत गैरहजर असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 (2) (ग) अन्वये त्यांना महानगरपालिकेच्या सेवेतून कायमचे कमी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.184 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शारदाश्रम सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मोकळ्या जागेवर बांधण्यात आलेल्या वाचनालयाच्या हॉलमध्ये वाचनालय कार्यान्वित करणे संदर्भात शारदाश्रम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांनी वाचनालय चालविण्यासाठी परवानगी मागितली आहे. सदरील वाचनालय कार्यान्वित करावयाचे असून मनुष्यबळ, देखभालीची जबाबदारी संस्थेची राहील त्यादृष्टीने खालील नियम व अटी वाचनालय चालविणाऱ्या संस्थेस देणे बाबतचा प्रस्ताव सादर करणेस्तव.

1. सदरील इमारतीचा ताबा मनपाकडे राहील.
2. वाचनालयातील साहित्याची देखभाल व जबाबदारी संस्थेची राहील.
3. शाखा वाचनालयाकरिता लागणारे साहित्य जसे वर्तमानपत्र, मासिके इ., फर्निचर आदींची जबाबदारी संस्थेची राहिल.
4. या हॉलचा उपयोग शाखा वाचनालयाच्या विविध उपक्रमाकरिता करणेत यावा.
5. यासाठी लागणारी विद्युत व्यवस्था मनपातर्फे उपलब्ध करून देण्यात येईल तथापि विद्युत बिलाचा खर्च संस्थेस करावा लागेल.
6. या ठिकाणी स्वच्छता, देखरेख यासाठी मनपाकडून मनुष्यबळाची उपलब्धता करून दिली जाणार नाही. ही व्यवस्था व व्यवस्थापन संस्थेकडे राहील.
7. सदरील शाखा वाचनालयाला वेळोवेळी भेट देणाऱ्या मनपाच्या ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना योग्य माहिती देणे बंधनकारक राहील.
8. या हॉलसाठी दिलेले साहित्य मनपाच्या परवानगीशिवाय इतर कामासाठी वापरता येणार नाही.
9. पुस्तक देवघेव बार्बीसाठी संबंधितांना मुख्य वाचनालय, खडकेश्वर येथे योग्य ते शुल्क भरणा करून सभासद व्हावे लागेल. ग्रंथकर्ज पध्दती (लोन पुरवठा) पध्दतीने पुस्तकांची उपलब्ध करून देणेत येईल.
10. संस्थेचे अध्यक्ष व सचिव यिांनी हा करारनामा स्वाक्षरीत करणे बंधनकारक आहे.
11. शाखा वाचनालय इतर कामासाठी वापरले जात आहे असे निदर्शनास आल्यास किंवा मनपास चालवावयाचे झाल्यास कोणत्याही वेळी हा करार रद्द करण्यांत येईल.
12. करारापोटी संस्थेस मनपाकडे रू.5000/- रक्कम अनामत म्हणून ठेवावी लागेल.
13. कराराचा कालावधी 2 वर्षाकरिता असेल.

याबाबतचे अंतिम निर्णय घेणेचा अधिकार, आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचा राहील.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : शहरातील ज्या ज्या भागात असे हॉल असतील ते त्या त्या भागातील नागरीकांना नाममात्र भाडयाने देण्यात यावे.

डॉ. आशा बिनवडे : माझ्या वार्डात एका आमदाराच्या निधीतून व्यायाम शाळा बांधण्यात आलेली होती. तेथे सदर आमदारांनी त्यांचे निधीतून ते बांधले म्हणून कूलूप लावले. ते महापालिकेच्या ताब्यात घेण्यात यावे.

श्री. मुजीब खान : रविंद्रनगर भागात एक हॉल आहे तेथे काही लोक वास्तव्य करून आहेत. अतिक्रमण केले. त्वरीत कार्यवाही करावी.

श्री. संजय सिरसाट : एका आमदारांनी त्यांचे निधीतून व्यायामशाळा बांधली होती. त्यांनी त्यांचे कूलूप लावले त्यांचेवर गुन्हा दाखल करावा.

डॉ. आशा बिनवडे : एका संस्थेने ५८ हजर रूपये दिले होते. वारंवार त्या व्यक्तीने मागणी करूनही त्यास ती व्यायाम शाळा दिली नाही. महानगरपालिकेने संबधीत आमदाराविरूध्द गुन्हा नोंदविला नाही. ती व्यायाम शाळा महानगरपालिकेने बांधलेली आहे ताब्यात घेण्यात यावे.

मा. सभापती : प्रशासकीय अधिकारी यांनी स.सदस्या डॉ. आशा बिनवडे तसेच श्री. मुजीब खान यांनी सूचना केल्या प्रमाणे दोन्ही हॉल संदर्भात योग्य कार्यवाही करावी. त्यांचा रिपोर्ट संबधीत सदस्यांना देण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शारदाश्रम सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मोकळ्या जागेवर बांधण्यात आलेल्या वाचनालयाच्या हॉलमध्ये वाचनालय कार्यान्वित करणे संदर्भात शारदाश्रम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांना वाचनालय चालविण्यासाठी, मनुष्यबळ, देखभालीची जबाबदारी संस्थेची राहील या व प्रस्तावात दर्शविलेल्या इतर अटी-शर्तीस अधीन राहून संस्थेस देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## विषय क्र.185 :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.7 भावसिंगपुरा येथे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.14,58,766/- चे असून या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 5 भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| 1. श्री.डी.अजितसिंग | 11.00% जास्त दराने |
| 2. मे. ए.एस. कन्स्ट्रक्शन | 26.29% जास्त दराने |
| 3. श्री. एम.ए. सिद्यीकी | 32.00% जास्त दराने |
| 4. मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | रेट दिलेले नाहीत. |
| 5. मे. चारणीया कन्स्ट्रक्शन | निविदा उघडली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.डी.अजितसिंग यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.00% जास्त दराची आहे. परंतु नवीन दरसूचीप्रमाणे अंदाजपत्रकाची तुलना केली असता 8.50% जास्त दराने सदर निविदेस मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे.

तरी सदरील कामासाठी 8.50% जास्त दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.7 भावसिंगपुरा येथे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 8.50% जास्त दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.186 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.78 चिकलठाणा अंतर्गत कॉंक्रीट रस्ते बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.29,70,100/- चे असून या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार (4) भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदाचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| 1. मे. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन | 17.00% कमी दराने |
| 2. मे. साई कन्स्ट्रक्शन | 16.21% कमी दराने |
| 3. मे. शाह कन्स्ट्रक्शन | 14.20% कमी दराने |
| 4. मे. सुंदर कन्स्ट्रक्शन | निविदा उघडली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची असून ती अं.प.दरापेक्षा 17% कमी दराची आहे. करीता मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 17% कमी दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.78 चिकलठाणा अंतर्गत कॉंक्रीट रस्ते बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 17% कमी दराची मे. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकाणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

“राष्ट्रगितानंतर” सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद